औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने संमत केलेले ठराव क्र. ७६३ दि. २.३.२०१५ व ठराव क्र. ११६१ दि. २०.७.२०१७ विखंडीत करण्यासाठी निलंबित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक:औमपा-२०१९/प्र.क्र.१०२/नवि-२४,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक:- १ ऑगस्ट,२०१९

<u>संदर्भ :-</u> १) आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांचे पत्र.जा.क्र./मनपा/शिक्षण/९१९/२०१९ दिनांक १५.३.२०१९
२) मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे रिट याचिका क्र. १०३७८/२०१६ मधील दि. ८.४.२०१९ चे आदेश

<u>प्रस्तावना</u> : -

औरंगाबाद महानगरपालिकेने शासन निर्णय,शालेय शिक्षण व क्रिडा विभाग दि.११.६.२००९ मधील तरतुदीनुसार स्वखर्चाने माध्यमिक व उच्च माध्यमिक वर्ग सुरु केलेले आहेत. त्याकरीता महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळेसाठी घडयाळी तासिका तत्त्वावर (रु.५४/-प्रति तास) या प्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात शिक्षक नियुक्त करण्यासाठी स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात दिली होती.

२. सदरच्या मुलाखतीनुसार ३४ घडयाळी तासिका तत्त्वावरील शिक्षकांना तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात आलेली होती. त्यापैकी सदयस्थितीत २२ घडयाळी तासिका तत्त्वावरील माध्यमिक शिक्षक कार्यरत आहेत.कार्यरत तासिका शिक्षकांना दिवाळी व उन्हाळयाच्या सुट्टयांमध्ये तांत्रिक खंड देवुन दर सहा महिन्यानंतर स्थायी समितीच्या मान्यतेने मुदतवाढ देण्यात येते. त्यानुसार संबंधित तासिका तत्त्वावरील शिक्षकांना दि.३०.४.२०१९ पर्यंत महानगरपालिकेने मुदतवाढ दिलेली आहे.

३. औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत माध्यमिक शाळा कार्यरत असुन या शाळेत ९ वी ते १० वी वर्गाच्या विदयार्थ्यांना शिकवण्यासाठी घडयाळी तासिका तत्वावरील कार्यरत शिक्षक यांच्या सेवा महानगरपालिकेस आवश्यक आहेत.त्यामुळे माध्यमिक शाळा संहिता नुसार या शिक्षकांना माध्यमिक सह शिक्षक म्हणुन पदनाम देवुन याबाबतचा प्रस्ताव शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद औरंगाबाद यांच्याकडे मान्यतेसाठी पाठविण्याकरीता सर्वसाधारण सभेने ठराव क्र. ७६३ दि. २.३.२०१५ संमत केलेला आहे.

त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळेत घडयाळी तासिका तत्वावरील २२ माध्यमिक शिक्षकांना जाहिरात,बिंदुनामावली आरक्षणाचा विचार करुन रितसर भरती केलेले असुन, या शिक्षकांना सह शिक्षकाचे पदनाम देवुन त्यांच्या वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करण्याबाबत सर्वसाधारण सभेने ठराव क्र. ११६१ दि. २०.७.२०१७ संमत केलेला आहे.

४. संबंधित सर्व २२ तासिका शिक्षकांच्या सेवा नियमित करण्यात याव्यात,सह शिक्षकांना देण्यात येणा-या वेतनानुसार वेतन व भत्ते देण्यात यावेत. तसेच अनुज्ञेय लाभ देण्यात येवुन त्यांच्या सेवा समाप्त करण्यात येवु नयेत याकरीता श्री. जाहेदखान साहेबखान पठाण व इतर यांनी उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्र. १०३७८/२०१६ दाखल केली आहे. औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने संमत केलेले ठराव विखंडीत करण्याबाबत महानगरपालिकेने शासनास सादर केलेल्या प्रस्तावाबाबत, शासनाने आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या कालावधीत निर्णय घ्यावा, असे निर्देश सदर न्यायालयीन प्रकरणात मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांनी दिनांक ८.४.२०१९ रोजी दिलेले आहेत.

५. महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळेत घडयाळी तासिका तत्वावरील २२ माध्यमिक शिक्षकांचे नियुक्ती आदेश हे तासिका तत्त्वावरील नेमणुकीकरीता दिलेले होते. सदर नेमणुका हया तासिका तत्त्वावरील असल्यामुळे त्यांच्या सेवा नियमित करता येणार नाहीत.त्याचप्रमाणे महानगरपालिकेने या शाळा चालविण्यासाठी तासिका तत्त्वावर शिक्षक भरती करण्याचे धोरण ठरविलेले असुन, त्यानुसार केवळ तासिका तत्त्वावर शिक्षक भरती केली आहे. सदर पदे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उमादेवी विरुध्द कर्नाटक शासन मधील निर्णय व तद्नंतर देण्यात आलेल्या शासन आदेशानुसार नियमित करण्यात येणार नाहीत असे महानगरपालिकेने त्यांच्या प्रस्तावात नमुद केले असुन, सर्वसाधारण सभेचे ठराव क्र. ७६३ दि. २.३.२०१५ व ठराव क्र. ११६१ दि. २०.७.२०१७ विखंडीत करण्याची विनंती आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी दि.१५.३.२०१९ च्या पत्रान्वये शासनास केलेली आहे.

६. महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळेत घडयाळी तासिका तत्वावरील २२ माध्यमिक शिक्षकांचे नियुक्ती आदेश हे तासिका तत्त्वावरील तात्पुरत्या नेमणुकीकरीता दिलेले होते. सदर नेमणुका हया तासिका तत्त्वावरील तात्पुरत्या स्वरुपाच्या असल्यामुळे त्यांच्या सेवा नियमित करता येणार नाहीत. त्याचप्रमाणे सर्वौच्च न्यायालयाने तात्पुरत्या/ अस्थायी नियुक्त्या नियमित न करण्याबाबत निर्णय दिलेले असल्यामुळे अश्या नियुक्त्या नियमित करू नये अश्या सूचना सामान्य प्रशासन विभागाने दि. २५.८.२००५ च्या परिपत्रकान्वये दिलेल्या आहेत.त्यामुळे सर्वसाधारण सभेने संमत केलेले सदर दोन्ही ठराव हे नियमानुसार नाहीत.

७. उपरोक्त नमूद बाबीं विचारात घेऊन औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने संमत केलेले ठराव क्र. ७६३ दि. २.३.२०१५ व ठराव क्र. ११६१ दि. २०.७.२०१७ निलंबित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

उपरोक्त प्रस्तावनेत नमूद केलेल्या वस्तुस्थितीनुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने संमत केलेले ठराव क्र. ७६३ दि. २.३.२०१५ व ठराव क्र. ११६१ दि. २०.७.२०१७

हे दोन्ही ठराव महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या विरुध्द असल्यामुळे, सदर ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ४५१ (१) नुसार विखंडित करण्यासाठी प्रथमत: निलंबित करण्यात येत आहेत.

सदर ठराव निलंबनाप्रकरणी संबंधितांना अभिवेदन करावयाचे असल्यास त्यांना निलंबन आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत शासनास अभिवेदन करणे आवश्यक आहे.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०८०११३०६४०१८२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kailas Madhukar Badhan

Digitally signed by Kailas Madhukar Badhan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=22804d8f98c03e9a67ca8eca6a02e7eaab4bcc4a3d59dfce4f1c7189ab74b085, serialNumber=e83c1c73de120837488d76379734db4868992e2b35ba1df8cfea9650fcff780f, cn=Kailas Madhukar Badhan
Date: 2019.08.01 13:13:15 +05'30'

(कैलास बधान)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई-३२
२) आयुक्त,औरंगाबाद महानगरपालिका,औरंगाबाद.
३) नगर सचिव, औरंगाबाद महानगरपालिका,औरंगाबाद
४) प्रधान सचिव, (नवि-२), नगर विकास विभाग, यांचे स्वीय सहाय्यक
५) निवड नस्ती (नवि-२४) (२ प्रती)